साप्ताहिक
# युगांतर
संपादक : डॉ. भालचंद्र कानगो

**आंतमध्ये...**

● प्रासंगिक परामर्ष...
● साथीचे आजार आणि ...
● राष्ट्रद्रोह...
● सुभाषचंद्र बोस आणि महात्मा गांधी !
● इतर बातम्या आणि वाचनीय मजकूर

वर्ष : ६७ अंक : ३८ पृष्ठे : १६ १९ मार्च २०२० ते २५ मार्च २०२० (मूल्य ५/-रुपये - वार्षिक वर्गणी रु.२५०/-)

## रंजन गोगोई यांची अगतिकता की मोदींची बक्षिसी?

- महादेव खुडे



सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश रंजन गोगोई यांची राज्यसभेसाठी मोदी सरकारने शिफारस केल्यानंतर देशभर गदारोळ माजला व लोकशाहीचा महत्त्वपूर्ण स्तंभ असलेल्या न्यायव्यवस्थेला संपविण्याच्या मोदी सरकारच्या षड्यंत्रावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले!

केंद्र सरकारने दोन तकलादू युक्तिवाद केले आहेत,पैकी एक म्हणजे अशा प्रकारचे कृत्य काँग्रेसच्या कार्यकाळातही झाले असल्याने त्यात गैर असे काही नाही. व दुसरे म्हणजे राज्यसभेला यातून एक चांगला कायदेपंडित मिळाल्याने इतर सदस्यांच्या ज्ञानात भर पडेल. वरील दोन्ही युक्तिवाद नेहमीच्याच पध्दतीप्रमाणे भंपक असल्याचे लपून राहिले नसून या मागील मोदी सरकारची खरी मनीषा काय व रंजन गोगोई यांची अगतिकता काय अथवा हितसंबंध काय याचीच चर्चा देशभर होऊ लागली आहे.

गोगोई हे ४६ वे सरन्यायाधीश म्हणून १७ नोव्हेंबर २०१९ रोजी निवृत्त झाले.निवृत्त होण्याच्या आधी आयोध्या-बाबरी मशीद खटला,सीबीआय,राफेल...अशा महत्त्वपूर्ण निकालात त्यांनी मोदी सरकारला क्लिनचिट दिल्याचा त्यांच्यावर आरोप होत आला आहे.

१२ जानेवारी २०१८ ला प्रथमच सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायमूर्तींनी सरन्यायाधीश अरुण मिश्रा यांच्या कार्यपध्दतीवर पत्रकार परिषद घेवून ताशेरे ओढले. स्वातंत्र्योत्तर भारतातील न्यायालयाच्या इतिहासातील ही पहिलीच घटना होती. कॉलेजियम पध्दतीला डावलून सरन्यायाधिश हे विशिष्ट खटले आपल्याकडे ठेवत असल्याचा आरोप या न्यायमूर्तींनी केला होता. यामध्ये न्यायमूर्ती चेलमेश्वर,जोसेफ कुरियन,मदन बी. लोकूर यांच्यासोबत रंजन गोगोई हे स्वत:देखील होते. न्यायव्यवस्थेला धोका असल्याचे या न्यायाधिशांनी सांगितले व लोकशाही वाचविण्याचे जनतेला आवाहन केले.त्यावेळच्या पत्रकार परिषदेत न्यायमूर्ती म्हणतात,'20 years from now,nation should not say we sold our souls! या प्रकरणामुळे या न्यायाधिशांवर टीका झाली खरी; पण मोदी सरकारच्या सर्वोच्च न्यायालयावरील दबावाचे जनतेपुढे बिंग फोडण्याची हिंमत या न्यायमूर्तींनी दाखवली! यावेळी नियमानुसार पुढचे सरन्यायाधीश हे रंजन गोगोई असणार असल्याकारणाने त्यांनी मोठी जोखीम पत्करल्याने त्यांचे विशेष कौतुक केले गेले.परंतु गोगोई अखेर सरन्यायाधिश झालेच! पण या १३ महिन्यांच्या कारकिर्दीत गोगोई यांनी आधीची प्रतिष्ठा धुळीला मिळविलीच पण राज्यसभेवर जाण्याच्या या निर्णयाने त्यात भर घातली. २०१८ ला या चार न्यायमूर्तींनी घेतलेल्या पत्रकार परिषदेला एक महत्त्वपूर्ण संदर्भ हा न्यायमूर्ती लोया यांच्या हत्येच्या खटल्याचा होता. अमित शहा यांच्यावर या प्रकरणात संशयाची सुई असल्याने हा खटला आपल्या अखत्यारीत आणण्यासाठी सरन्यायाधिश प्रयत्न करीत असल्याचे हे चार न्यायमूर्ती अप्रत्यक्षरित्या सूचित करीत होते.

मिश्राच्या नंतर सरन्यायाधिश झालेल्या गोगोईना आपल्याच

वचनांचा विसर नंतर पडला व त्यांनी आपलेही पाय मातीचेच असल्याचे दाखवायला सुरुवात केली. राफेल भ्रष्टाचार प्रकरणात तर गोगोईंनी केंद्र सरकारला सरळसरळ क्लिन चिट देवून लोकसभा निवडणुका जिंकण्याचा मार्ग मोकळा करून दिला. सीबीआय प्रकरणात आलोक वर्मा यांच्या विरोधात दिलेला निकाल असो किंवा ट्रिपल तलाक किंवा अगदी अलीकडील रामजन्मभूमी-बाबरी मस्जिद संदर्भातील निकाल असो, गोगोई यांनी आपले सर्व ईमान केंद्र सरकारला अर्पण केले. अवघ्या चार महिन्यांपूर्वी ट्रॅब्यूनल मेंबर्सच्या रिअपॉईटमेंटला विरोध करणारे गोगोई स्वत:चेच धोरण बदलून लाभदायक होतात याला काय म्हणावे?

गोगोई यांनी हे का मान्य केले असावे? २०१२ साली अरुण जेटली यांनी न्यायाधिशांनी निवृत्तीनंतर २ वर्षे तरी कोणत्याही शासकीय संस्थेवर नियुक्तीस जावू नये; तसे झाल्यास त्यांनी नियुक्तीआधी दिलेल्या निकालाकडे संशयाने पाहिले जाईल,असे म्हटले होते. जेटली हे मोदींचे निष्ठावान होते त्यामुळे जेटलींची साक्ष काढायची झाल्यास व ते भाजपाचे असल्याने ती खरीच आहे, हे गृहीत धरल्यास गोगोई यांची राज्यसभेवर झालेली नियुक्तीची शिफारस हे त्यांच्या केंद्र सरकारवरील प्रेमाचेच बक्षीस आहे,हे समजावून घेण्यासाठी जास्त डोके खाजवण्याची गरज नाही!

भाजपच्या वतीने मात्र निर्लज्जपणे यांत काही गैर नसून काँग्रेसच्या काळातही अशाप्रकारचे निर्णय घेतले गेल्याचे म्हटले आहे. यासाठी रंगनाथ मिश्रा, ज्यांनी उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना निवडणूक लढविण्यासाठी राजीनामा दिला होता,त्यांचा संदर्भ देण्यात येतो. रंगनाथ मिश्रा यांना ६ वर्षानंतर सदस्य बनविण्यात आले,असे काँग्रेसचे नेते सांगतात हे थोडावेळ बाजूला ठेवले तरी काँग्रेसने उशीरा शेण खाल्ले मग आम्ही लवकर खाल्ले त्यात काय वावगं?असं सांगितलं जात आहे.

खरेतर, प्रश्न मोदी सरकारचा नाहीच. भारतीय संविधान व लोकशाही संपविण्याचा विडा उचललेल्या सुनियोजीत कटाचा एक भाग म्हणून मोदींच्या या प्रयत्नांकडे पाहता येईल व त्यात हे सरकार यशस्वी होताना दिसत आहे. एकतर आमच्या कळपात सामील व्हा, अन्यथा परिणाम भोगण्यास तयार रहा, असाच या सरकारचा नारा आहे. अनेक जणांनी केवळ जीवाच्या भीतीने या कळपात सामील होणे पसंत केले आहे.जे या कळपाबाहेर आहेत, त्यांचे मौनही 'बोलके' आहे!

रंजन गोगोई यांना आपल्या कळपात आणल्याने भाजपाला अनेक लाभ होणार असल्याचे बोलले जाते. पैकी सन २०१८ ला घेतलेल्या पत्रकार परिषदेत न्यायव्यवस्थेच्या नि:स्पृहतेच्या बाता मारणाऱ्या व मोदींमुळे लोकशाही धोक्यात आहे, असे सांगणाऱ्याला अखेर नाक रगडत आपल्या कळपात येण्यास भाग पाडण्याचा आनंद तर आहेच; पण त्याच वेळी या न्यायमूर्तींना पाठींबा देणाऱ्यांना सणसणीत चपराक मारण्याचाही यात फायदा आहे. आसाममधील एनआरसीचा निकाल गोगोई यांचाच आहे. त्यामुळे तेथील अडचणी निस्तरणे व पुढील निवडणुकीत त्यांचा फायदा करून घेणे हा मोदींचा एक उद्देश आहेच. थोडक्यात राज्य सभेच्या एका दगडात अनेक पक्षी मारून ब्राह्मणी राष्ट्रवादाचा घोडा उधळविणे हे लपून राहिलेले नाही.

लोया यांच्या हत्येचा संशय या सरकारवर आहे. त्यातून सुटण्यासाठी अधिकाधिक विधायक कृत्यं करून देशात हुकूमशाही राजवट आणण्याचा प्रयत्न हे सरकार करणार, हे आता निश्चितच झाले आहे. तरीही लगेच गोगोईवर टीका करणारे नि:स्पृह बाण्याचे न्यायमूर्ती लोकूर व नुकतीच ज्यांची बदली झाली,ते दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मुरलीधरन यांचे व देशातील होरपळणाऱ्या कष्टकरी जनतेचे आवाज बुलंद राहतीलच!

रंजन गोगोई सरन्यायाधीश झाल्यानंतर त्यांच्यावर न्यायालयातील एका महिला कर्मचाऱ्याने लैंगिक शोषणाचा आरोप केला. गोगोई यांनी आपल्या हाताखालील सहकाऱ्यांचा बेंच तयार करून स्वत:च ते आरोप फेटाळून लावले. गोगोई निवृत्त झाल्यावर ती महिला पूर्ववत न्यायालयात रूजू झाली. तिला न्याय मिळाला का? हा प्रश्न आता कुणीही विचारत नाही! या काळात रंजन गोगोई यांनी उद्वेगाने म्हटले होते, 'माझ्या २० वर्षांच्या कार्यकाळाचा हाच ईनाम आहे काय?' गोगोई यांना कदाचित ती शिक्षा असल्याची कल्पना आलीही असेल? ईनाम तर मोदी सरकारच्या कळपात सामील झालेल्यांना मिळतात!, हा इशारा गोगोई यांच्या नंतर लक्षात आला असेल हे त्यांच्या नंतरच्या निकालावरून दिसून येते. कदाचित उपरोक्त निकाल ही गोगोईंची राज्यसभेची तयारीच असावी,असे आता स्पष्ट होत आहे.

यावरून मोदी विरोधकांनी एक धडा घेतला पाहिजे तो हा की,मोदींचे म्हणणे आहे,'एकतर लोया व्हा!, अन्यथा लॉयल व्हा!!'

**पक्ष सभासद व युगांतरच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी**

**राजभुवन येथील राज्य पक्ष कार्यालयातील २३८५७०७७ हा फोन आता बंद करण्यात आला आहे. आता फक्त २३८५८०४४ हाच फोन चालू आहे.**

# कोरोनाशी लढायला आपण समर्थ आहोत काय?

- प्रा. आनंद मेणसे

कोरोना या विषाणूने जगातील १५३ देशांत शिरकाव केला आहे. या विषाणूची लागण झाल्यामुळे ५ हजारांवर लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. सुरूवात झाली ती चीनमधून. चीनमधील हुआन प्रांतात हे विषाणू सर्वप्रथम आढळले आणि चीनमध्ये भीतीचे वातावरण पसरले. जगातील एका बलाढ्य देशाला एका विषाणूने हैराण करून सोडले. चीननेही हे आव्हान स्वीकारत आपल्या पद्धतीने मोर्चेबांधणी करण्यास सुरूवात केली. हुआन प्रांतास उर्वरीत चीनपासून पूर्णपणे वेगळे केले आणि साऱ्या प्रांताचेच रूपांतर एका मोठ्या इस्पितळात व्हावे तसे त्यांनी केले. चीनमधील व्यवस्था असे करू शकते. तेथील जनता अशावेळी शासनाच्या पाठीशी उभी राहते. चीनने आपल्या पद्धतीने या विषाणूशी मुकाबला करत आपल्या देशातील जनजीवन पूर्वपदावर आणण्यात यश मिळविले आहे. आता प्रश्न आहे तो आमचा. भारताचा.

आपल्या देशातील महाराष्ट्र, केरळ या दोन राज्यातून या विषाणूचा फैलाव मोठ्या प्रमाणावर झाला आहे. त्यानंतर बाकीची राज्ये येतात. केरळ आणि महाराष्ट्रातच हा फैलाव होण्याचे कारण की विदेशातून या राज्यात आलेल्यांची संख्या मोठी आहे. दिसते असे की हा विषाणू विदेशातून भारतात आलेल्या प्रवाशांमार्फत आला. याचा असाही अर्थ होतो की, समाजातील श्रीमंतवर्गात याचा फैलाव प्रथम झाला आहे. कारण ही माणसे कामानिमित्त, सहलीसाठी विदेशात गेली होती. चीनच्या खालोखाल या विषाणूचा फैलाव इटलीमध्ये झाला. इटली हे लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. इटलीमधून मायदेशी येणारे प्रवासी हा विषाणू घेऊन आले. भारताबाबतही असेच घडले आहे.

कोरोना विषाणूमुळे होणारा 'कोविद-१९' हा आजार वरिष्ठ मध्यमवर्गीय व श्रीमंत स्तरातील माणसांपुरता सिमीत आहे. खरा धोका केव्हा निर्माण होईल जेव्हा या आजाराचा फैलाव सामान्य माणसात होईल. भारतात तर अशा माणसांची संख्या मोठी आहे आणि या आजाराचा फैलाव रोखण्यासाठी जी यंत्रणा उभी करणे आवश्यक होते ती यंत्रणा उभी करण्यात आणि याबाबतचे प्रबोधन करण्यात आपण किती सक्षम आहोत हा खरा प्रश्न आहे. असे का म्हणावेसे वाटते याची काही उदाहरणे देता येतील. कोरोना विषाणूची चर्चा सुरू असतानाच रंगपंचमीचा सण आला. रंगपंचमीच्या सणात मोठ्या संख्येने लोक एकत्र येतात. एकमेकांवर रंगांची उधळण करतात. यामध्ये सुके आणि ओले रंग वापरले जातात. अशा ठिकाणी विषाणूचा फैलाव होण्याचा धोका असतो. खरे तर प्रशासनाने पुढाकार घेऊन यावर्षी या सणावर कायदेशीर निर्बंध घालणे आवश्यक होते. पंतप्रधान महोदयांनी आपण रंगपंचमीचा सण साजरा करणार नाही असे म्हणत एक संदेश देण्याचा प्रयत्न केला. पण तो वरिष्ठ पातळीवरच सिमीत राहिला. गावपातळीवर मात्र त्याचे पालन झाले नाही. भारतीय समाज हा उत्सवप्रिय असल्याने केवळ प्रबोधनाने हे काम भागणार नाही. प्रबोधनाच्या जोडीला प्रशासनाची साथ हवी. आवश्यकता वाटलीच तर कायद्याचा बडगा उगारला जाणे आवश्यक.

रंगपंचमीच्या सणापाठोपाठ येतो गुढी पाडवा. हा सणही मोठ्या उत्साहात साजरा करण्याची प्रथा आहे. आता तरी कोरोना विषाणूंची तीव्रता ध्यानात घेऊन गुढी पाडव्याचा सण घरगुती स्वरूपात साजरा होईल व सार्वजनिकरित्या होणार नाही याची काळजी घेतली जाणे आवश्यक आहे. येथे प्रशासनाचा कस लागणार आहे. व्यापक जनहित ध्यानात घेऊन प्रशासनाने काही गोष्टी राबविणे आवश्यक आहे. गुढी पाडव्याच्यानंतर सुरू होतात ग्रामीण भागातील यात्रा. यात्रांच्या निमित्ताने कुस्तीचे फड भरतात. मनोरंजनाचे कार्यक्रम होतात. घरी पैपाहुणे येतात. यात्रेनिमित्त सभोवतालच्या गावातील लोक एकत्र येतात. यांना आता रोखायचे कसे? कारण हीच ठिकाणे आहेत. जेथून कोरोना विषाणूचा फैलाव मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. येथे जबाबदारी आहे ती जिल्हाधिकाऱ्यांची. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व तालुक्यांच्या तहसीलदारांना बोलावून घेऊन त्यांच्या तालुक्यात होणाऱ्या यात्रांची माहिती मिळविली पाहिजे व त्यांच्यामार्फत त्या त्या गावातील पंचायतीच्या सभासदांना, यात्रा आयोजित करणाऱ्या समितीला, गावातील पंच मंडळींना समजून सांगून यात्रा यावर्षीपुरती स्थगित करा असा आग्रह धरला पाहिजे. जे कोणी ऐकणारच नाहीत त्यांच्यावर कायद्याचा बडगा उगारायला प्रशासनाने मागे पुढे पाहू नये. तरच या यात्रा थांबतील आणि धोका टळेल. यात्रा एका वर्षासाठी थांबली म्हणून देव काही नाराज होणार नाही. पण धोका पत्करून यात्रा केल्यास देव नाराज होईल असे या लोकांना समजून सांगण्याची नितांत गरज आहे.

कोरोना विषाणूचा धोका आहे तो मोठ्या शहरांना. जेथे कामावर जाण्यासाठी माणसांना एसटी बस, लोकल रेल्वे यांच्यावर अवलंबून राहावे लागते. मुंबईतील लोकल रेल्वे ज्या पद्धतीने धावते ते ध्यानात घेता असे म्हणावेसे वाटते की मुंबईत जर या विषाणूचा शिरकाव झाला तर अवघ्या काही दिवसातच हा विषाणू मुंबईभर पसरेल. शाळा,

महाविद्यालयांना शासनाने सुटी जाहीर केली आहे. आयटी कंपन्यांनी आपली कार्यालये बंद ठेवून कर्मचाऱ्यांना घरातून काम करण्यास परवानगी दिली आहे. हे आयटीसाठी शक्य आहे. इतरांचे काय? दोन वेळेच्या भाकरीसाठी राबणारा जो मुंबईकर आहे त्याला घरी बसून कसे चालेल. त्याला कामावर जावेच लागणार. आता अशा माणसांसाठी आपण कोणते नियोजन केले आहे?

नियोजन करण्याची क्षमता आपणाकडे निश्चितपणे आहे. पण त्यासाठी जी एक राजकीय इच्छाशक्ती लागते तिचा अभाव आपणाकडे जाणवतो. यात्रा स्थगित केल्यावर आपले मतदार नाराज होतील काय? असा विचार करणारे अनेकजण आहेत. यांच्याकडून खंबीर निर्णयाची अपेक्षा कशी करायची.

रुग्णाची तपासणी करण्यासाठी जी यंत्रणा आवश्यक आहे तिचा अभाव आहे. एव्हाना प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक तपासणी केंद्र उभे करण्याची गरज असताना आपण जिल्ह्याच्या ठिकाणी एक केंद्र उभे करू शकलेलो नाही. आपली प्राथमिक आरोग्य केंद्रे इतकी अशक्त आहेत की त्यांच्याकडून कोरोना विषाणूचा मुकाबला होईल अशी अपेक्षा व्यक्त करणेच कठीण. आरोग्य विभागावर होणारा खर्च सरकारने कमी करून आरोग्य व्यवस्थेचे खासगीकरण करण्यावर भर दिल्यामुळे हे असे घडले आहे. किमान आतातरी आपल्या सरकारने आपले आरोग्यविषयक धोरण बदलावयास हवे आणि ते लोकाभिमुख कसे होईल हे पाहावयास हवे.

कोरोना विषाणूचा फैलाव ध्यानात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. काही उपायही सुचविले आहेत. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने आपल्या देशात आरोग्य आणीबाणी जाहीर केली आहे. स्वत: राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी आपल्या कुटुंबियाची तपासणी करून घेतली. स्पेनच्या पंतप्रधानांनी आपली तपासणी करून घेतली. स्पेनच्या पंतप्रधानांच्या पत्नी कोरोनाग्रस्त असल्याचे आता जाहीर झाले आहे. याचा अर्थ असा की अमेरिका, स्पेन, इटली, फ्रान्स, इंग्लंड या देशांनी कोरोना विषाणूकडे आवश्यक त्या गांभीर्याने पाहिले आहे. दुर्दैवाने हे गांभीर्य आपणाजवळ अभावानेच आढळते आणि हीच तर खरी चिंतेची बाब आहे.

येणारा काळ कसोटीचा आहे, आणीबाणीचा आहे. प्राप्त परिस्थितीत सर्व जबाबदारी शासनावर सोपवून आपण गप्प बसून चालणार नाही. प्रत्येकाने या संकटाला सामोरे जाण्यासाठी प्रयत्न करावयास हवेत. जेथे प्रबोधनाची गरज आहे तेथे प्रबोधन करावे. जेथे प्रत्यक्ष मदतीची गरज आहे तेथे जाऊन मदत करावी. ज्यांना प्रत्यक्ष काम करणे कठीण भासते; त्यांनी आपल्या कुवतीनुसार अर्थसहाय्य करावे. अशा अनेक गोष्टी वैयक्तिक पातळीवर तसेच सामाजिक पातळीवर केल्या जाऊ शकतात.

इतिहास असे सांगतो की जेव्हा जेव्हा असे विषाणू समाजात थैमान घालतात तेव्हा तेव्हा त्याचा बळी हा समाजातील दुर्बल घटक ठरला आहे. बकाल झोपडपट्टीत राहणारे आदिवासी, भटके असे जे समाज आहेत ते अशा आजारांना बळी पडण्याचा धोका आहे आणि म्हणून हा विषाणू या समाजापर्यंत पोहोचणार नाही याची काळजी घेतली जाणे अत्यंत आवश्यक आहे. आजार झाल्यावर उपचार करण्यापेक्षा आजार होणारच नाही याची काळजी कशी घेता येईल हा खरा प्रश्न आहे. आपल्या बाजूने जमेची बाजू अशी आहे की, मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी, डॉक्टर्स, आशा वर्कर्स, सामाजिक कार्यकर्ते, आरोग्य क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते या सर्वांना बरोबर घेऊन शासनाने काही ठोस योजना आखण्याची आज नितांत गरज आहे. आजचे वातावरण पाहता लोकांनी या आजाराची धास्ती घेतली आहे. लोक घाबरलेले आहेत. अशा घाबरलेल्या जनतेला दिलासा देण्याचे काम आधी व्हायला हवे. कोरोना विषाणूशी दोन हात करण्याची शक्ती आपल्या देशाकडे आहे मात्र तिचा उपयोग व्हावयास हवा.

# बार्शी येथे आयटक बांधकाम कामगार संघटनेचा उत्साहात मेळावा !

**बार्शी :** आयटक संलग्न बांधकाम कामगार संघटनेचा मेळावा बार्शी येथे उत्साहात संपन्न झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मेळाव्यास प्रारंभ करण्यात आला. कॉ. तानाजी ठोंबरे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बांधकाम कामगार संघटनेची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्षपदी कॉ. ए. बी. कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. तर कॉ. अनिरूध्द नकाते, कॉ. प्रविण मस्तुद, कॉ. शौकत शेख, बालाजी शितोळे, संतोष मोहिते, परमेश्वर पवार, राम पालखे, आनंद धोत्रे, अजय दिवाणजी यांची सदस्यपदी निवड करण्यात आली.

यावेळी बोलताना कॉ. कुलकर्णी म्हणाले, आयटक ही देशपातळीवरील संघटना बांधकाम कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष करत आहे. बांधकाम कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, तसेच घरे उपलब्ध करून देणे असे प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून लढा उभारण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी कॉ. लक्ष्मण घाडगे, भारत भोसले, धनाजी पवार, पवन आहिरे यांच्यासह बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साथीचे आजार आणि जागतिकीकरण...

- माधव दातार

## ...यांचा संबंध आता अधिक गुंतागुंतीचा बनला आहे! पडघम-राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय...

जागतिकीकरण आणि साथीच्या रोगांचा संबंध खूप जुना आहे. इ.स. १४९२ मध्ये कोलंबस अमेरिकेच्या किनाऱ्यावर पोचल्यावर या युरोपीय दर्यावर्दीने त्याच्याबरोबर आणलेल्या विषाणूंच्या प्रभावाने तिथले अनेक स्थानिक (रेड इंडियन्स) लोक मृत्युमुखी पडले! नंतरच्या ५२५ वर्षांत वैद्यकीय तंत्र आणि जागतिकीकरण यांत अर्थातच मोठे बदल झाले आहेत. त्या परिणामी साथीचे आजार आणि जागतिकीकरण यांचा संबंध आता अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. जागतिकीकरणामुळे विविध देशांमधील वस्तू, सेवा आणि भांडवल यांची देवाणघेवाण तर वाढली आहेच; पण आंतरराष्ट्रीय प्रवासही सुलभ झाला आहे. व्यापार, पर्यटन, शिक्षण यासाठी होणारा प्रवास प्रचंड वाढला आहे.

या सर्वांचा प्रभाव डिसेंबर अखेरीस चीनच्या वुहान प्रांतात प्रथम प्रादूर्भाव झालेल्या करोना विषाणूचा प्रसार ज्या पद्धतीने जगभर झाला/होत आहे त्यावर दिसून येतो. हा विषाणू नवा नसला–आपल्या सर्वांच्या परिचयाच्या डेटॉलवरही ते करोना विषाणूचा नायनाट करते, असा दावा केलेला असतो - तरी त्याने प्रथम चीनमध्ये थैमान घातले आणि ज्याची आता सर्व जगात लागण होत आहे. त्याला 'कोविद-१९' असे विशेषनाव मिळाले आहे.

त्याचा प्रसार आणि प्रभाव याचा तीन पातळ्यांवर विचार करता येतो. साथीचा (पक्षी वेगाने प्रसार पावणारा) रोग म्हणून मानवी जीवनाला संभवत: धोका निर्माण करणारा तो एक घटक आहेच. जागतिकीकरणामुळे विविध देश अधिक परस्परावलंबी बनल्याने ज्या घटकांचा प्रभाव पूर्वी मुख्यत: स्थानिक असे, तो आता सुलभ (आणि म्हणून वाढलेल्या) व्यापार, गुंतवणूक, प्रवास यांतून अधिक व्यापक बनला आहे, हे दुसरे परिमाण. शिवाय या सर्व बाह्य बदलांचा परिणाम मानवी वर्तनावर झाल्याने या वर्तनात्मक बदलांचा परिणाम परत साथीच्या तीव्रतेवर–वास्तविक किंवा भासमान – होतो, ही याची तिसरी बाजू आहे.

**वैद्यकीय परिमाण !**

साथीचे रोग आणि मानवी समाज यांचा जुना संबंध आहे. त्याचा प्रादूर्भाव कशाने होतो, याचे ज्ञान नसल्याने आणि त्याची लागण वेगाने होत असल्याने त्याचा चांगलाच धसका असे. आरोग्याच्या सार्वजनिक बाजूकडे फारसे लक्ष नसल्याने दूषित पाणी आणि प्राणी यांच्यामार्फत पसरणारे साथीचे रोग जसे नियमित असत, तसेच जीवघेणेही. साथीच्या भिन्न रोगांवर नियंत्रण मिळाल्यानेच सरासरी आयुर्मान वाढले आहे आणि आरोग्य सेवांची उपलब्धता सर्वत्र समान किंवा सारखीच परिणामकारक नसली तरी सुधारलेल्या मानवी जीवनमानाचे ते एक महत्त्वाचे परिमाण आहे.

शंभर वर्षांपूर्वी म्हणजे १९१८-१९२० या काळात सर्व जगभर इन्फ्लुएंझाची मोठी साथ आली होती. याचा प्रसार प्रथम पहिल्या महायुद्धात सहभागी राष्ट्रात झाला असला तरी युद्धमान देशांनी ही बातमी दडवून ठेवली. स्पेन मात्र युद्धात सहभागी नसल्याने तेथील लागण जगाला प्रथम समजली. त्यामुळे ही साथ स्पेनमध्ये सुरू झाली, या समजातून या आजारास 'स्पेनिश फ्ल्यू' असे नाव मिळाले. भारतात - विशेषत: नागरी भागात-त्याचा प्रभाव दिसून आला. लागण झालेले लोक ओळखून त्यांना वेगळे ठेवणे तेव्हा अधिक कठीण असल्याने मृतांची संख्या लक्षणीय (१ ते २ कोटी) होती. यांचा आर्थिक परिणामही–राष्ट्रीय उत्पन्नाची तेव्हा मोजणी होत नसली तरी– मोठा होता. भारतासाठी १९१८ ची नोंद एक खडतर वर्ष म्हणून आर्थिक इतिहासकार करतात.

पण वर्तमानाचा विचार करताना एकविसाव्या शतकात तर विविध विषाणूंचा प्रभाव – सार्स, मर्स, इबोला – नियमितपणे दिसला आहे. त्यामुळे साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळवल्याचा दावा आता टिकून राहीलच असे म्हणवत नाही. कोविद १९ हा सार्स किंवा मर्सच्या तुलनेत कमी घातक असला तरी त्याचा प्रसार वेगाने होतो असे आढळले. कोविद १९ मुळे जगभर मरण पावलेल्यांची संख्या (आतापर्यंत ४६१३) हृदयविकार अगर कर्करोग किंवा रस्ते अपघात यांद्वारे होणाऱ्या मृतांच्या तुलनेत कमी आहे, असे सांगितले जाते. मात्र विविध प्रदेशांतील मृतांचे प्रमाण सार्वजनिक आरोग्य सेवांची स्थिती आणि उपलब्धता यावरही अवलंबून असेल.

लागण झाल्याची बातमी चीन सरकारने काही काळ तरी लपवून ठेवल्याचा आरोप खरा असला तरी, नंतर प्रादूर्भाव झालेल्या वुहान शहरास निराळे करून ते बंद ठेवण्याचे काम तत्परतेने झाले, हे आता मान्य होत आहे. ज्या गतीने विशेष रुग्णालये सुरू झाली आणि अर्थव्यवहार थांबवून लोकांनी एकत्र येणे नियंत्रणात आणले, त्याचा परिणाम रोगाचा चीनमधील प्रसार आणि तेथील मृतांची संख्या (आदमासे ३१७३) नियंत्रित राहण्यात झाला असावा.

चिनी आकडेवारीबाबत अविश्वास सामान्य असला तरी

कोविद-१९ची हाताळणी तिथे परिणामकारक ठरली, याचे एक गमक चीनला रोगाचा प्रादूर्भाव विशिष्ट प्रदेशात मर्यादित राखता आला यांत आहे. रोगाची चाचणी आवश्यक त्या मोठ्या प्रमाणात दक्षिण कोरिया आणि इटली या देशांत झाली, पण इराण व अमेरिकेत मात्र ती झाली नाही. अमेरिकेत सार्वजनिक आरोग्य सेवा फार विस्तृत नसल्याचा हा परिणाम असावा. आवश्यक त्या प्रमाणात तपासण्या/चाचण्या न झाल्यास लागण किती झाली आणि त्यात मृतांचे प्रमाण किती होते यांचे मापनही सदोष राहते.

चीनमधील साथ आटोक्यात येत असतानाच इतरत्र तिचा प्रसार वाढताना दिसतो. युरोपमध्ये मृतांची संख्या तुलनेत जास्त आहे. कोणत्याही कारणाने ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी झाली आहे, त्यांना कोविदचा सामना करणे कठीण जाते असा अनुभव आहे. कदाचित युरोपात वृद्ध लोकांचे प्रमाण जास्त असल्याने तेथे जास्त लोक मृत्यूलोकी गेले असावेत. भारतात आजवर मृत पावलेल्या दोन्ही व्यक्ती जास्त वयाच्या होत्या.

आजवर भारतात सापडलेले संशयित रुग्ण (११०) आणि मृत व्यक्ती (२) यांची संख्या कमी राहिली आहे, ही सुदैवाची बाब आहे. पण आजाराचा प्रसार थांबवणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. रोग चाचणी/तपासणीच्या सोयी सरकारी संस्थांतच आणि मर्यादित आहेत. आता कोविद-१९च्या निमित्ताने खाजगी प्रयोगशाळांना यांत सहभागी केले जाणार आहे, ही बाब स्वागतार्ह आहे. आपल्या सार्वजनिक आरोग्य सेवांची स्थिती लक्षात घेता जर खरोखरच कठीण परिस्थिती निर्माण झाली तर आपण तिचा सामना किती/कसा करू शकू यांचा विचार सर्वांनी करायला हवा.

चीनच्या कार्यक्षमतेचा उल्लेख झाला की, तेथील हुकूमशाहीचा मुद्दा हमखास पुढे येतो. पण त्वरित निर्णय घेणे आणि त्याची काटेकोर/त्वरित अंमलबजावणी हे हुकूमशाहीचे व्यवच्छेदक लक्षण कधीच नव्हते. शिवाय डॉक्टर/इस्पितळे, तेथील खाटा यांची उपलब्धता चीनमध्ये जास्त आहे, याचीही नोंद घेणे आवश्यक आहे.

करोना विषाणूचा प्रादूर्भाव चीनमध्ये झाल्यापासून भारतीय जीवन पद्धतीचे (शाकाहारी आहार, योग, मृतांचे दहन करण्याची पद्धत इ.) गोडवे समाजमाध्यमांवर गायले जात असले तरी त्याचा परिणाम आपल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत वाढ, बदल/सुधारणा करण्याची गरज नाही, असा समज होण्यात झाला तर ते धोकादायक ठरेल. स्वच्छतेचा विचार केला तर घरगुती/वैयक्तिक स्वच्छता आणि सामाजिक स्तरावर कमालीचा गदळपणा यांचे मिश्रण खास भारतीय किंवा आशियाई आहे!

कोविद-१९ वयस्कर लोकांस जास्त हानिकारक आहे - भारतात ६० वर्षावरील व्यक्तींचे प्रमाण फक्त ९ टक्के आहे – आणि येथील उष्ण हवामान – जे विषाणू प्रसारास प्रतिबंधक मानले जाते – या दोन्ही बाबी भारतात विषाणू प्रसार होण्यास काहीशा रोधक ठरल्या तरी लोकसंख्येची जास्त घनता आणि पाण्याची कमी (आणि असमान) उपलब्धता (सतत हात धुण्यास आवश्यक) या दोन गोष्टी विषाणूच्या जलद प्रसारास सहाय्यभूत ठरू शकतील.

**आर्थिक परिणाम !**

पूर्वीच्या शेती आधारित, ग्रामीण जीवनपद्धतीत रोगप्रसाराच्या शक्यता मर्यादित असल्याने त्यांचा प्रभाव – वैद्यकीय आणि आर्थिक - स्थानिक स्वरूपाचा राही. पाण्याद्वारे पसरणारे आजार नद्यामुळे पसरत किंवा तीर्थक्षेत्री मोठा समुदाय जमे त्यातून. उद्योग, व्यापार यांचे प्रमाण कमी असल्याने आर्थिक परिणाम स्थानिकच राहत. आता ही स्थिती बदललेली आहे, हे रोग प्रसाराच्या बातम्यांतूनच दिसून येते. इटालियन प्रवासी जयपूरला निराळा/अलग करावा लागला किंवा दुबईहून परतलेला संशयित रुग्ण हिंगोलीला आढळतो, यासारख्या घटनांतून प्रवासाचा परिणाम दिसतो.

चीन सर्व जगाशी घनिष्ठ संबंध असलेली मोठी अर्थव्यवस्था असल्याने कोविद-१९चा सामना करण्यासाठी जे बंदी नियम लागू झाले, त्याचा परिणाम चीनच्या अर्थव्यवस्थेवर तर होईलच, पण चीनकडून कच्चा माल आयात करणाऱ्या इतर देशांतील विविध उद्योगही प्रभावित होतील, हे अपेक्षित होतेच. जागतिकीकरणाने वस्तू उत्पादन विखुरलेल्या पद्धतीने होऊ लागल्याने वस्तू उत्पादनाची पुरवठा साखळी आंतरराष्ट्रीय बनते. या साखळीतला एखादा दुवा जरी निखळला तरी अनेक देशांत त्याचा परिणाम जाणवतो.

चीनमधील घडमोडींचा परिणाम कंपन्या किती साठा बाळगतात आणि आयातीला किती वेळ लागतो, यावर हा परिणाम किती वेगाने होतो, हे अवलंबून राहील. चीन व्यवहार बंद झाल्याचा परिणाम चीन आयात वस्तूंच्या पुरवठ्यावर दोन-अडीच महिन्यांनी दिसतील अशी अपेक्षा होती. भारतातील इलेक्ट्रॉनिक्स, औषध आणि रसायन उद्योग चीनमधील करोनाने प्रभावित होतील अशीही अपेक्षा होती. मात्र त्याचा प्रादूर्भाव इतर देशांत – विशेषत: युरोप, अमेरिका– दिसू लागल्यावर हे चित्र बदलले. रोगप्रसाराला आळा घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रवासावर आणि देशांतर्गत जेथे लोक मोठ्या संख्येत एकत्र येतात, तेथे (मॉल, सिनेमा/नाट्यगृहे, खेळ) बंधने आल्याने पर्यटन, हॉटेल आणि करमणूक या क्षेत्रांवर परिणाम झाला.

चीनच्या तुलनेत हे निर्बंध जरी सौम्य असले तरी पुरवठा साखळीतील अडचणीमुळे वस्तूंचा पुरवठा कमी होतानाच, या निर्बंधांमुळे मागणीही कमी होण्यास सुरुवात झाली. बाजारपेठा सामान्यत: टोकाची भूमिका घेत असल्याने जागतिक अर्थव्यवहार मंदावतील, या भीतीने क्रूड तेलाचे भाव ३०

टक्क्यांनी कमी झाले आणि शेअर बाजारही गडगडला.

भारतात येस बँक संकटात आल्याने हा परिणाम जास्त गंभीर होता. जागतिक उत्पन्नात किती टक्के घट येईल, यांचे आता अंदाज बांधणे सुरू आहे. कोणत्याही कारणाने अर्थ व्यवहार मंदावतील अशी पुसटशी शंका आली तरी जगभरातील मध्यवर्ती बँका व्याज दर कमी करतात आणि व्यापारी बँकांना जास्त पैसा उपलब्ध करून देतात. पण विविध सरकारी निर्बंध आणि त्या जोडीला खबरदारी म्हणून ऐच्छिकरित्या जे व्यवहार (काही काळ तरी) कमी होतील, त्याला व्याज दर कमी केल्याने कसा अटकाव होईल हे स्पष्ट नाही. माहितीचा स्फोट झाल्याने जनतेचा प्रतिसाद कसा असेल त्यावरही आर्थिक परिणाम अवलंबून राहील.

भारतात रिझर्व बँकेने अजून रेपो दर कमी केला नसला तरी एप्रिलच्या सुरुवातीस तो कमी झाल्यास काहीच नवल नाही. राष्ट्रीय उत्पन्न किती कमी होईल यांचा अचूक अंदाज करता येणे शक्य होणार नाही, कारण छोट्या असंघटित व्यवसायातील उलाढाल आणि उत्पन्न मोजण्याची आपली पद्धत खूप ढोबळ आहे. कोविद-१९ चा प्रसार रोखण्यात आपण यशस्वी झालो, तर साथीचे आर्थिक परिमाणही अर्थातच मर्यादित राहील.

**मानवी वर्तन !**

संसर्गजन्य रोगांचा प्रादूर्भाव होणे ही बाब मानवी इतिहासात नवीन नसली तरी वर्तमानात फेसबुक, ट्विटर आणि व्हॉटसॲपसारख्या समाजमाध्यमांचे प्रभावशाली अस्तित्व अशा प्रसंगी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. २००३ साली सार्सचा उद्रेक झाला तेव्हा फेसबुक किंवा व्हॉटसॲप असे काहीच नव्हते. २००९ मध्ये स्वाईन फ्लू आला तेव्हा फेसबुक वापरणारे १५ कोटी लोक होते. २०१४ मध्ये इबोला उद्भवला तेव्हा व्हॉटसॲप वापरणारे ४५ कोटी लोक होते. २०१९ मधील कोविद - १९च्या आगमनप्रसंगी व्हॉटसॲप वापरणाऱ्यांची संख्या २०० कोटी आणि फेसबुकवाले १७० कोटी लोक होते.

यातील दोन्ही माध्यमांचा वापर करणारे बरेच लोक आहेत हे गृहीत धरले तरी 'जोडलेल्या' लोकांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे हे उघड आहे. याचा उपयोग रोगाचे स्वरूप, लक्षणे, त्याचा प्रसार आणि त्यावरील उपचार याबाबतची माहिती वेगाने लोकांपर्यंत पोचवण्यास उपयोगी ठरेल. याचा उपयोग साथ नियंत्रणात होऊ शकतो. रोगाचा प्रादूर्भाव झालेल्या ज्या लोकांना एकांतवासात राहावे लागेल, त्यांना या समाजमाध्यमाद्वारे आपल्या माणसांच्या 'संपर्कात' – त्यांना इजा न पोचवता- राहता आल्याने त्यांचे मन:स्वास्थ्य चांगले राहून रोगप्रतिकार अधिक प्रभावीपणे करता येईल. या उलट रोग प्रसाराच्या खोट्या, अतिरंजित बातम्या वेगाने पसरल्याने घबराट होऊन रोगाचा आर्थिक परिणाम अधिक गडद होण्याचा जसा धोका आहे, तसाच भारतीय जीवनपद्धतीत या रोगाचा सामना करण्याची शक्ती आहे.

यामागे चीन/अमेरिका यांचा परस्परांवर मात करण्याचा हेतू आहे किंवा पाश्चात्य औषध कंपन्यांचा आपला व्यवसाय/नफा वाढवण्याची ती एक शक्कल आहे, असा अपप्रचार (याला अपप्रचार म्हणणे ही बाबही समाजमाध्यमांवर टीकेची राळ उठण्यास पुरेशी ठरू शकते!) करण्यासाठीदेखील हे माध्यम - त्याच्या दृक्श्राव्य परिणामामुळे - अधिक प्रभावी ठरू शकते. याचा विपरीत परिणाम साथीचा मुकाबला करण्यावर होऊ शकतो. समाजमाध्यमे दोन्ही बाजूंना उपलब्ध आहेत. त्यामुळे फक्त त्यांना दोष देता येणार नाही; फक्त त्यांचाच दोषही नसतो!

## 'करोना'च्या धर्तीवर सफाई कामगारांच्या सुरक्षेची काळजी घ्या !

# आयटक संलग्न मराठवाडा न. पा. मनपा कामगार–कर्मचारी संघटनेची मागणी

**नांदेड :** 'करोना'च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कंत्राटी व कायम सफाई कामगारांच्या सुरक्षिततेबद्दल तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आयटक संलग्न मराठवाडा न. पा. मनपा कामगार-कर्मचारी संघटनेच्यावतीने नांदेड मनपाचे प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

जगभर 'करोना' व्हायरसने थैमान घातले असून सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. संपूर्ण राज्याचे प्रशासन 'करोना'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना करीत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर घरोघरी जावून, गल्लीबोळातील कचरा उचलणारे सफाई कामगार थेट हाताने कचरा उचलतात. त्यातच 'करोना' व्हायरस हा श्वसनातून फैलावणारा आजार असल्याने सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्हा व मनपा प्रशासनाने काळजी घ्यावी. तसेच या कामगारांना तातडीने मास्क, गमबुट, हँडग्लोज, ॲप्रान, सॅनिटायझर आदी साधने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी आयटक संलग्न मराठवाडा न. पा. मनपा कामगार-कर्मचारी संघटनेच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर कॉ. प्रदीप नागापूरकर, कॉ. के. के. जांबकर, कॉ. शिवाजी फुलवळे, कॉ. शांताबाई पवळे, कॉ. वंदना वाघमारे, कॉ. वैशाली धुळे, कॉ. अर्चना मोरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लोकशाही वाचविण्यासाठी सीएए विरोधातील लढ्यात सहभागी व्हा!

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ. सुभाष लांडे यांचे अकोला येथे आवाहन...



**अकोला : भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या देशव्यापी जनजागृती अभियानाच्या पोस्टरचे अनावरण करताना पक्षकार्यकर्ते.**

**अकोला :** नागरिकत्व संशोधन कायदा (सीएए), राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर (एनपीआर) आणि नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन (एनआरसी) हे कायदे लोकशाही व संविधानविरोधी भूमिका घेऊन राबविले जात आहेत. याचा त्रास केवळ मुस्लिमांनाच नाही तर श्रमिक, आदिवासी व सर्वसामान्य जनतेला होणार आहे. त्यामुळे या कायद्याला कठोर विरोध करण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने देशव्यापी जनजागृती अभियान सुरू केले असून, लोकशाही वाचविण्यासाठी या अभियानात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ. सुभाष लांडे यांनी केले. अकोला येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा कौन्सिल बैठकीत ते बोलत होते. पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. रामचंद्र धनभर अध्यक्षस्थानी होते.

सध्याच्या देशातील राजकारणाचा आढावा घेताना कॉ. लांडे म्हणाले की शेतकरी, कामगारांच्या अनेक मागण्या प्रलंबित असताना आणि कोणीही मागणी केलेली नसताना सीएए-एनपीआर-एनआरसी कायदा लादून नागरिकत्व कायद्याच्या नावाखाली देशामध्ये हिंदू-मुस्लिमांचे ध्रुवीकरण करण्याचा डाव केंद्रातील भाजपा सरकारने आखला आहे. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्व जाती-धर्माच्या लोकांनी रक्त सांडले. या देशात सर्व जातीधर्मीचे लोक पिढ्यनपिढ्या गुण्यागोविंदाने नांदत आहेत. मात्र नागरिकत्व कायद्याच्या नावाखाली धर्माच्या नावावर द्वेष पसरवून दंगली घडविण्याचा घाट सरकारने घातला आहे. भारतीय संविधानाने दिलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही तत्त्वे वाचवण्याची जबाबदारी आपली आहे. याच उद्देशाने भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने २३ मार्चपर्यंत राबविल्या जाणाऱ्या देशव्यापी जनजागृती मोहिमेत जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कॉ. रामचंद्र धनभर म्हणाले, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने सुरू केलेल्या या मोहिमेत जनतेच्या अन्य मागण्यांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सार्वजनिक उद्योगांची विक्री थांबवा, खाजगीकरण रद्द करा, शिक्षणावर जीडीपीच्या १० टक्के खर्च करा, मनरेगासाठी अर्थसंकल्पात भरीव वाढ करा, आरक्षण वाचवा, सामाजिक न्यायाचे जतन करा, केंद्र व राज्य सरकारमधील रिक्त जागा त्वरित भरा, शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करा, आदी मागण्यांचा समावेश असून, यासाठी सह्यांची मोहीम राबविली जात आहे.

कॉ. एस. एन. सोनोने यांनीही मार्गदर्शन केले. जिल्हा सचिव कॉ. रमेश गायकवाड यांनी प्रास्ताविकात जिल्ह्यातील पक्षकार्याचा आढावा घेतला. कॉ. नयन गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. कॉ. सुनीता पाटील यांनी आभार मानले.

बैठकीला दुर्गा देशमुख, मदन जगताप, सुहास अग्निहोत्री, रामदास ठाकरे, कुसुम हागे, सरोज मुर्तीजापूरकर, प्रिया बरोटे, मायावती बोरकर, छाया वारके, सविता प्रधान, शशिकला पाखरे, प्रतिभा यादव, स्वाती गायकवाड, कुरुमदास गायकवाड, संतोष वावळ, सुमित गायकवाड, शालिनी चाहांदे यांच्यासह पक्षाचे अनेक सभासद उपस्थित होते.

## महत्त्वाचे निवेदन

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने हल्लीच www. cpimedia. org या नावाने आपले संकेतस्थळ (website) सुरू केले आहे. या संकेतस्थळावरील माहिती अधिकाधिक परिपूर्ण व्हावी यासाठी आपणाकडे असलेली पक्षाच्या धोरणांविषयीची जुनी कागदपत्रे, छायाचित्रे पुढील पत्त्यावर पाठवावीत. भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्यालय, राजभुवन, ३१४, सरदार वल्लभभाई पटेल रोड, मुंबई- ४.

**– संपादक मंडळ**

# राष्ट्रद्रोह वयाच्या १० व्या वर्षी !

- रमेश वडणगेकर, कोल्हापूर

नुकतीच कन्हैयाकुमार यांच्यावर देशद्रोहाचा खटला घालण्याची परवानगी दिली असल्याची बातमी वाचली. सन २०१६ साली दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी निदर्शने केली होती. या निदर्शनावेळी देशविरोधी घोषणा दिल्याचा आरोप कन्हैयाकुमार यांचेवर आहे या संदर्भातील लेख प्रसिद्ध झाला, अशीच एक घटना कर्नाटकमध्ये घडली.

कर्नाटकातील बिदर येथील शाहीन प्रायमरी स्कूलमधील शिक्षक व विद्यार्थी, विद्यार्थीनीच्या आईला देशद्रोहाच्या खटल्यास तोंड द्यावे लागत आहे. या शाळेतील सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलांनी २१ जानेवारी नागरिकत्व कायद्या संदर्भात नाटक सादर केले, त्यानंतर २६ जानेवारी रोजी शाळेतील मुख्याध्यापक, मुलीचे पालक, विद्यार्थ्यांवर एफआरआय दाखल झाला. सदरचा एफआयआर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी दाखल केला.

नाटकात नागरिकत्व कायद्यासाठी काय पुरावे सादर करावे लागणार या संदर्भात संवाद होता, तसेच हे संवाद मुलांनी तयार केले, त्यासाठी युट्यूब वरील माहिती घेतली.

नाटकामध्ये असे संवाद होते त्यामधील म्हातारीचे पात्र म्हणते - 'त्यांना चप्पलाने मारा'. पोलीसांनी सर्व मुलांमध्ये चौकशी केली. नाटक कुणी लिहिले? नाटक शिक्षकांनी पाहिले होते का? नाटकात ज्या मुलीने हा संवाद म्हटला त्या मुलीच्या आईला पोलिसांनी अटक केली, कारण हा संवाद तिने घरी ऐकला होता. याबाबत त्या अडाणी आईची प्रतिक्रिया - मी एनआरसी कायद्याबाबत काय माहिती देणार. मी फक्त संवाद घरी ऐकला, म्हणून मला अटक झाली.

या नाटकातील कोणती भूमिका पोलिसांना देशविरोधी दिसली. पोलिसांनी या मुलीचे चप्पलही जप्त केली आहे. किती दक्ष पोलीस पाहा. थप्पड हा शब्द वापरल्याबद्दल या मुलींने माफी मागितली आहे. पोलीसांनी या नाटकात काम करणाऱ्या या दहा वर्षांच्या मुलांना नाहक त्रास दिला.

या नाटकताली अहमद नावाचा मुलगा म्हणतो - आम्हाला सीएए, एनआरसी फुल फॉर्म देखील माहीत नाही पण माझा संवाद असा होता, 'कागज नहीं दिखायेंगे' पोलीस सारखे मुलांना प्रश्न विचारत होते हा संवाद कोणी लिहिला, या शाळेच्या शिक्षिका म्हणते प्रत्येक आठवड्यात मुले एक कार्यक्रम करतात, त्यातून त्यांचे स्टेजवर बोलण्याचे धाडस वाढते, या आठवड्यात मुलांनी नागरिकत्व कायदा विषय निवडला, त्याची किंमत आम्हाला मोजावी लागली. शाळेचे मुख्याध्यापक यांना अटक झाल्यामुळे विद्यार्थी-शिक्षकात घबराहटीचे वातावरण झाले आहे.

बिदर हे ब्राह्मणी राज्याची राजधानी, त्यामध्ये बसवकल्याण हा मतदारसंघ आहे. सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा बसवेश्वर नावांने प्रसिद्ध आहे. १२ व्या शतकात स्त्री-पुरुष समानता, जाती निर्मूलनाचे काम त्यांनी केले. बिदरमध्ये मुस्लीम समाजाची लोकसंख्या १९% आहे. बिदर अशांत राहावा यासाठी भाजपा नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे. येथे नागरिकत्व कायद्यास विरोध वाढत आहे.

शिवाजी नगरचे आमदार रिझवान अर्शद म्हणतात - सरकारचा फॅसिस्ट चेहरा या घटनांमागे आहे. पोलिसांचे वर्तन पक्षपाती आहे, राज्य सरकारचा दबाव पोलीसावर आहे.,

या नाटकामुळे मला मी शाळेत केलेले नाटक आठवले, सन १९८४-८५. मी सहावीच्या वर्गात शिक्षण घेत होतो, त्यावेळी मंडल आयोग संदर्भात चर्चा, दंगे सुरू होते, आम्हाला त्यावेळी मंडल आयोग म्हणजे काय हे देखील कळत नव्हते, शाळेतील सामाजिक काम करणाऱ्या सरांनी मंडल आयोग नाटक बसविले, आम्ही ते सादर केले. मंडल आयोगास विरोध म्हणून भाजपाने राम रथ यात्रा काढली. आज आपण पाहतो त्यावेळी दोन खासदार असणारी मंडळी आज केंद्रात सत्तास्थानी आली आहेत.


नाटकातून कोणता देशद्रोही संदेश गेला, नाटक, चित्रपट यातून लोकांची मनं बिघडणारे, घडणारे माध्यमे आहे का? चित्रपट गृहात राष्ट्रगीत म्हटल्यामुळे देशभक्ती वाढते का?

कन्हैयाकुमार संदर्भात देशद्रोही घोषणा, जाणीवपूर्वक पेरल्या गेल्या, कन्हैय्याकुमारची लोकप्रियता, त्यांच्या 'जन गण मन यात्रेस' चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याची लोकप्रियता राजकीय मंडळींना डाचणारी आहे म्हणून त्यावर आरोप केले गेले. लोकांना खोट्या खटल्यात गुंतविणे सतत भीती दाखविणे सुरू आहे.

लोकांच्या मूलभूत प्रश्न शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी यावर ही सत्ताधारी मंडळी काहीही करीत नाहीत. जातीजातीत तेढ निर्माण करायची हेच त्यांचे भांडवल आहे. लोकांनी या मंडळींचे खरे रूप जनतेसमोर आणण्यासाठी जनजागृती व संघर्ष करावा, असे वाटते.

**(सदरची माहिती The Week Feb. 23 अंकावरून घेतली आहे.)**

# डॉ. भालचंद्र मुणगेकर लिखित व लोकवाङ्मय गृह प्रकाशित 'माय एन्काउंटर्स इन पार्लमेंट' इंग्रजी पुस्तकाचा प्रकाशन समारंभ, दिल्ली








कॉ. डी. राजा



श्री. शरद पवार



श्री. हमीद अन्सारी



कॉ. सीताराम येचुरी

## 'कोरोना'मुळे आयटक शिक्षकेतर संघटनेची 'वर्क फ्रॉम होम'ची मागणी !

**बार्शी :** आयटक संलग्न सोलापूर विद्यापीठ व संलग्न महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या सोलापूर जिल्हा शाखेच्यावतीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय म्हणून ३१ मार्च २०२० पर्यंत घरी बसून काम (वर्क फ्रॉम होम) करण्याची परवानगी द्यावी व त्याबाबतचे स्पष्ट आदेश तत्काळ निर्गमित करावेत, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री, उच्चशिक्षण मंत्री, उच्च शिक्षण संचालक व कुलगुरू, सोलापूर विद्यापीठ यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, की शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सध्या विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमध्ये कामास बोलावले जात आहे. कोरोनाचा संसर्ग वाढत असताना शिक्षकेतर कर्मचारी वर्गाला प्रवास करून कामावर येणे भाग आहे. अशा गंभीर परिस्थितीत शिक्षकेतर बांधवांना कोरोना आजाराची लागण होण्याची दाट शक्यता आहे. असे झाल्यास उच्च शैक्षणिक क्षेत्रात या आजाराची लागण होईल व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनादेखील याची हानी पोहचेल.

निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष कॉ. तानाजी ठोंबरे, सचिव प्रविण मस्तुद यांच्या सह्या आहेत. यावेळी ए. बी. कुलकर्णी, आरती रावळे, उमेश मदने, हरिदास बागल, काशिनाथ कोळी, हणुमंत कारमकर, विलास कोठावळे, सुधीर सेवकर, परमेश्वर पवार उपस्थित होते.

# सुभाषचंद्र बोस आणि महात्मा गांधी !

- ॲड. संजय पांडे (९२२१६३३२६७)

२०१४ च्या निवडणुकीपूर्वी आरएसएसच्या शाखांतून आणि भाजपकडून सरदार वल्लभभाई पटेल यांचा वापर गांधी-नेहरू यांना लक्ष्य करण्यासाठी केले जायचे. सत्तेत आल्यानंतर भाजपकडून नेताजी सुभाषचंद्र बोस यांचाही वापर गांधीं-नेहरूंच्या प्रतिमांचे हनन मोठ्या प्रमाणात केलं गेलं. या विषयावर महात्मा गांधी यांना लक्ष्य करणारे बरेच मजकूर मागच्या ६ वर्षापासून उजव्या विचारसरणीकडून सोशल मीडियावर प्रसृत करण्यात येत आहेत.

इतिहासकार रामचंद्र गुहा यांनी याबद्दल महत्त्वाची माहिती आपल्या 'गांधी बिफोर इंडिया' पुस्तकातून मांडली आहे. डाव्या व पुरोगामी विचारांचे सुभाषचंद्र बोस यांचे वल्लभभाईंशी फार चांगले संबंध नव्हतेच. पुढे अनेक कारणांनी तणाव तयार होऊन ते अत्यंत खराब अवस्थेत गेले. १९३३ मध्ये वल्लभभाईंचे थोरले बंधु विठ्ठलभाई हे गंभीर आजारी व मरणासन्न अवस्थेत असताना त्यांची सुभाषबाबूंनी खूप सेवासुश्रुषा केली होती. त्यामुळे प्रभावित होऊन विठ्ठलभाई यांनी आपल्या इच्छामृत्यू पत्रात आपल्या संपत्तीचा तीन-चतुर्थांश (७५ टक्के) भाग बोस यांच्या नावे करून टाकला. त्यात 'ह्या संपत्तीचा वापर भारताच्या हितासाठी इतर देशांमध्ये प्रचार प्रसार करण्यात खर्च करण्यात यावा' ही अट देखील टाकली गेली. वल्लभभाई यांनी या इच्छामृत्यू पत्राच्या प्रामाणिकतेवर शंका उपस्थित केली. डॉक्टरांनी साक्षंकीत का केले नाही? मूळ कागदपत्रे संरक्षित आहेत का?, सर्व साक्षीदार बंगालीच का? जिनेवा जिथे विठ्ठलभाइंचं निधन झालं तिथे उपस्थित स्वातंत्र्यसैनिक किंवा काँग्रेस नेत्यांची सही का नाही? सही खरी कश्यावरून? असे अनेक प्रश्न उपस्थित केले. वर्षभर चाललेल्या कायदेशीर लढयानंतर शेवटी कोर्टाने ही संपत्ती रक्तसंबंधीयांच्या हवाली केली. त्यासाठी विठ्ठलभाई स्मृति ट्रस्ट बनवण्यात आली.



भारताला राजकीय, व्यक्तिगत किंवा वैचारिक दृष्टीने मुक्त करण्याची इच्छा हा समान दुवा सोडला तर बोस आणि पटेल यांच्या विचारांत जुळण्यासारखे काहीच नव्हते. १९२८ साली कलकत्त्यात काँग्रेसचे अधिवेशन भरवण्यात आले. या अधिवेशनात महात्मा मोहनदास गांधी यांनी ब्रिटीशांना भारताला अधिराज्य दर्जा (डोमिनियन स्टेट्स) देण्याचा ठराव मांडला. तिथे मिलिटरी स्टाइलमध्ये सुभाषचंद्र बोस यांनी २००० स्वयंसेवकांच्या 'गार्ड ऑफ ऑनर' ची व्यवस्था केली होती. त्यातले हजार स्वयंसेवक सैनिकी गणवेश घालून होते. कलकत्त्यात ब्रिटिश सैनिकांचे कपडे शिवणाऱ्या 'हरमन्स' फर्मकडून स्वतः सुभाष बाबू यांनी वरिष्ठ सैन्य अधिकाऱ्यासारखा गणवेश शिवून घेतला होता. स्वत:साठी फील्ड मार्शलची छडी (बॅटन) बनवून घेतली होती. साधेपणाने जगणाऱ्या गांधींना मात्र हे सर्व विचित्र वाटल्याने त्यांनी ह्याला 'बेट्रम मिल्सची सर्कस' (ब्रिटेनची त्यावेळची सुप्रसिद्ध सर्कस कंपनी) नाव दिलं.

राजमोहन गांधी यांनी पटेल यांच्या जीवनचरित्रात लिहिलं आहे, 'त्यांना (वल्लभभाई) सुभाषच्या कार्यक्षमतेवरच शंका होती. शिवाय त्यांचे सुभाष सोबत खोलवर असहमत होते. पटेल यांचे मत होते की १९३७ साली काँग्रेसची निवडून आलेली सरकारे राहावी असे पटेल यांचे मत होते. पण बोस यांनी काँग्रेसने सर्व मंत्रालये सोडून सरकारशी युद्ध पुकारण्याची भूमिका घेतली होती. हे पटेल यांना अनुचित वाटल्याने अमान्य होते. दुसरा एक महत्त्वाचा फरक गांधीजींना घेऊन होता. सुभाषचंद्र यांच्या नजरेत त्यावेळी गांधींच्या मताना एका मर्यादेपलीकडे महत्त्व नव्हतं; पण सरदार यांच्यासाठी गांधी पूर्णपणे आवश्यक होते.

५ वर्षानी १९३८ हरिपुरा येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनाच्यावेळी महात्मा गांधी यांनी सुभाषचंद्र बोस यांचे नाव अध्यक्ष म्हणून प्रस्तावित करण्याचा निर्णय घेतल्यावर वल्लभभाई पटेल यांनी तीव्र नापसंती व विरोध दर्शवला; परंतु गांधीजी हे बोस यांच्याच नावावर ठाम राहिले. त्यामुळे बोस हे अध्यक्ष म्हणून निवडून येऊ शकले. मात्र तेव्हाही अध्यक्ष म्हणून निवडले गेल्यानंतर सुभाषचंद्र यांनी ५१ बैलगाड्यांवर स्वागत करत असलेल्या केशरी साडी घातलेल्या ५१ महिला स्वयंसेविका ह्या ५१ प्रवेशद्वारातून ५१ ब्रास

ब्रँडच्या ताफ्यात निघतील अशी राजाच्या स्वागतासाठी केली जाते तशी जंगी व्यवस्था केली होती.

पुढच्यावर्षी पुन्हा १९३९ साली बोस यांच्या निवडणूक लढण्याला पटेल यांनी तीव्र विरोध केला. त्यांनी सार्वजनिकपणे चेतावणी दिली की 'बोस जर निवडून आलेच तर आम्ही त्यांची धोरणं व्हेटोने (नकाराधिकार) हाणून पाडू, गरज पडली तर कार्यकारी समितिद्वारे (पटेल समर्थकांकडून) व्हेटोचा वापर करू.' बोस पुन्हा निवडणूक जिंकून काँग्रेसचे नेतृत्व करतील अशी परिस्थिति निर्माण झाली तेव्हा पटेल यांना वाईट वाटून त्यांनी राजेंद्र प्रसाद यांना लिहिले की, 'मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की ते (सुभाष) पुन्हा निवडणुकीसाठी अशा प्रकारच्या गलिच्छ तंत्रांवर उतरतील.' सुगाता बोस त्यांच्या 'हिज मेजेस्टी ऑप्शनंट' या पुस्तकात लिहितात, पटेल यांचे म्हणणे आहे की सुभाषांचे पुनरुत्थान 'देशहितासाठी हानिकारक असेल'. यावर प्रत्युत्तर देताना बोसना, पुन्हा एकदा निवडणूक लढवण्यापासून रोखण्यासाठी वल्लभभाई 'नैतिक बंधन' वापरत असल्याचा आरोप केला.

गांधीजी यांनी उच्च वर्णीय असल्याने बोस यांना राष्ट्रीय अध्यक्ष होऊ दिले नाही ही माहिती पूर्ण खोटी आहे. २९ जानेवारी, १९३९च्या काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत नेहरू यांनी भाग घेतला नाही, मौलाना आझाद ह्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आणि आंध्रप्रदेशचे गांधीवादी नेते डॉ. पट्टाभि सितरामैया यांनी निवडणूक लढवली. त्या निवडणुकीच्या वेळी बोस यांच्या विरोधात गांधींपेक्षा काँग्रेसमधले सनातनी व हिंदुत्ववादी विचारसरणीकडे कल असलेले नेते जास्त होते. पटेल टीका करण्यात त्यांच्या बाजूने तितकेच निर्मम होते. बोसने त्यांना 'गैरलोकशाहीवादी' म्हणून संबोधले तेव्हा ते रागाने म्हणाले, 'जंगलात सिंह जन्माद्वारे राजा बनतो निवडणुकीत नाही'. १९३९ मध्ये काँग्रेसच्या अंतर्गत संघर्ष वेगळ्या पातळीवर गेला होता. इथे महात्मा गांधींचा विरोध सुभाषचंद्र बोस यांच्याशी त्यांच्या हिंसक मार्गांचा वापर करून ब्रिटिशांशी लढा देण्याच्या विचारांशी होता. हा विरोध पूर्णतः तात्विक होता, गांधींकडून तसा विरोध असणं हा त्यांचा अधिकार म्हणून पाहिलं गेलं पाहिजे.

पटेल आणि गांधी यांच्याविरोधी असूनही बोसने १९३९च्या काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक पुन्हा जिंकली व पट्टाभी सितरामैय्यांना पराभूत केले. पटेलजींनी राजेंद्र प्रसाद यांना लिहिले, 'सुभाषबरोबर काम करणे आपल्यासाठी अशक्य आहे.' गांधी-पटेल गटाने बोस यांच्या अध्यक्षीय अधिकारांना कमजोर करण्याचे कार्य केले, ज्याने हताश होऊन बोस यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पटेल यांचे विश्वासू राजेंद्र प्रसाद यांची हंगामी अध्यक्ष म्हणून वर्णी लावण्यात आली. बोस यांचा कट्टर विरोध पटेल यांना घेऊन होते. परंतु गांधी यांना घेऊन ते तितके कठोर नव्हते. सुभाषचंद्र यांचे भाऊ शरत यांनी वल्लभभाईंवर आरोप केला की त्यांनी सुभाषचंद्रच्या विरोधात 'स्वार्थी, द्वेषपूर्ण आणि प्रतिशोधी' प्रचार युद्ध चालवलं.

बोस यांच्या पराभवासाठी पंत यांच्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन पटेल व पंत यांनी शर्थीचे प्रयत्न करून पाहिले. त्या निवडणुकीत सुभाषचंद्र यांना १५८० मतं आणि सितारमैय्या यांना १३७७ मतं मिळाली. फक्त २०३ मतांच्या फरकाने बोस जिंकले. नेहरू यांचे देखील बोस यांनाच सुप्त समर्थन होते. गांधींना हा पराजय जिव्हारी लागल्याने 'सितारमैय्या यांचा पराजय माझा पराजय' असल्याचं मत व्यक्त केलं. पुढे अंतर्गत राजकारणातून व मतभेदांतून खिन्न होऊन सुभाषचंद्र यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. महात्मा गांधी यांच्या मतभेदापेक्षा बोस यांचे प्रखर विरोधक काँग्रेसचे सरदार पटेल, जी. डी. बीडला, गोविंद वल्लभ पंत, राजगोपालाचारी आणि राजेंद्र प्रसाद हे होते. गांधी यांना लक्ष्य करत असताना यांचं आज कोणी नावं देखील घेत नाही. बोस देशात तुफान लोकप्रिय होते, नेहरूही होते परंतु गांधींविरोधात बंड पुकारून निर्णय घेण्याची धमक फक्त बोस मध्ये होती.

गांधींचा विरोध जर डाव्या विचारांना असता तर त्यांनी नेहरूंना देखील विरोध केला असता कारण नेहरू उघड समाजवादी विचारांचे होते आणि देशाच्या क्रांतिकारक आंदोलनांचे जाहीर समर्थक होते. पण सुभाषचंद्र यांचा मार्ग हिंसेचा असल्याने त्याच्याशी नेहरू, गांधी यांचे स्वाभाविक मतभेद होते. शहिद भगतसिंह यांनी १९२८ साली लिहिलेल्या 'नये नेताओं के अलग अलग विचार' या लेखात काँग्रेसच्या ह्या तरुण तुर्क नेत्यांचे विविध मतभेद व वैचारिक कल याचा आढावा घेतला आहे. पटेल आणि बोस या दोघांच्या राजकीय मतभेदांच्या पलीकडे यांच्यात वैचारिक मतभेदही भरपूर होते. बोस समाजवादी नियोजनाचे समर्थक होते तर पटेल खाजगी उपक्रमांबद्दल अधिक सहानुभूतीशील होते. हिंदू-मुस्लिम सद्भावनेसाठी बोस हे पटेलांपेक्षा खूप अधिक आग्रही व कटिबद्ध होते. नियोजन आणि धर्मनिरपेक्षता यांसारख्या मुद्द्यांवर बोस आणि नेहरू एकाच विचारांचे होते. गांधींशी निष्ठा आणि एक्सिस राष्ट्रांची आघाडी (जर्मनी, इटली व जापान) ही मित्र राष्ट्रांच्या आघाडीपेक्षा (ब्रिटन, संयुक्त राज्य अमेरिका, सोवियत संघ व चीन) अधिक धोकादायक असल्याच्या मुद्द्यावर नेहरू व पटेल यांच्यात एकमत होते.

१९४०च्या सुमारास सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेस पक्षातच 'फॉरवर्ड ब्लॉक' नावाने नवीन डाव्या विचारांची आघाडी बनवायची सुरुवात केली. याला नेहरूंचा विरोध नव्हता. पण ब्रिटिशांना हा गट मजबूत झाल्यास काँग्रेस ह्या बलाढ्य

**(पुढील मजकूर पान १४ वर...)**

# मंदिराअगोदर ज्ञानमंदिर उभारणारे बनाचीवाडीचे शेतमजूर !

- डॉ. सुभाष देसाई, कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरीजवळ गावात स्टँडपासून डाव्या बाजूला थोडं वळलं की तीन-चार किलोमीटरवर एक वाडीवस्ती लागते. बनाचीवाडी.. फारतर दोन हजार लोकसंख्येचे गाव. पण त्या गावात 'गाव करील ते राव काय करील' या म्हणीचे प्रत्यंतर येते. या गावातले ९० टक्के स्त्री-पुरुष आजूबाजूच्या गावांमध्ये मोलमजुरीसाठी जातात. एका बाजूला काळमवाडी; दुसऱ्या बाजूला राधानगरी अशी दोन प्रचंड जलाशये असूनसुद्धा या गावाला पाणी नाही. डोंगरातून नळाचे पाणी येते. मे महिन्यात पाण्याचा ठणठणाट असतो. त्यामुळे शेती सोडा, छोटीशी बाग करणे सुद्धा मुश्किल होते. पिरळ आणि राधानगरी येथून सकाळी लवकर जीप येतात, टेम्पो येतात आणि त्यातून शेतमजुरांना घेऊन जातात. गावात राहतात ती लहान मुलं, शिक्षक आणि वयोवृद्ध जोडपी.

इथल्या शाळेमधल्या आधुनिक प्रयोगांमुळे इथं काही लोक येऊन भेटून जातात. शाळेमध्ये आम्ही गेलो आणि या शाळेमध्ये ध्येयवाक्य वाचले, 'ध्यास गुणवत्तेचा'. आता शेतमजुरांचा गाव आणि गुणवत्तेचा ध्यास त्यांनी घ्यावा, हे ग्रामीण भाषेत सांगायचं झालं तर आक्रितच होतं. शेतमजुरांना ज्ञानाची भूक लागणं आणि आपली पुढची पिढी चांगली शिकून मोठी झाली पाहिजे अशी स्वप्नं त्यांनी पाहणं हेच भारत देश जागा झाल्याचं लक्षण आहे.

या बाल मंदिराची कथा अतिशय अनुकरणीय आहे. भुदरगड तालुक्यातील पंचायत समितीचे अधिकारी, दोन प्राचार्य, एक पाटबंधारे खात्याचे डेप्युटी इंजिनिअर, कॉम्प्युटर कंपोझिट ट्रेनिंग कोर्स प्राध्यापक, एक पत्रकार, एक निवृत्त समाजकल्याण अधिकारी अशा शाश्वत विकास चळवळीच्या लोकांनी तेथे जाऊन ग्रामसभा घेऊन चांगले काम करणाऱ्या मुख्याध्यापक, ग्रामपंचायत, सरपंच, शिक्षक, सदस्य यांना प्रोत्साहन दिले. त्यांचा सत्कार केला आणि त्यांच्या पाठीशी आम्ही ठाम आहोत असे आश्वस्त केले.

बनाचीवाडीमध्ये २०१७ ला ग्रामस्थांनी बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये दोन विषय होते. जुने खापराचे हनुमान मंदिर नव्याने बांधावे आणि त्याच वेळेला दुसरा विषय होता, शाळेची दुरावस्था झालेली आहे. मग सर्वांच्यामध्ये चर्चेचा खल झाला आणि वयोवृद्ध माणसांनी सांगितले, देव हाय तिथं हाय. तो कुठे जात नाही. पण प्रथम आपण शाळा सुधारू तर पुढची पिढी शहाणी होईल. शेतमजूर म्हणून राहणार नाही. या जुन्या-जाणत्या माणसांच्या सल्ल्यानुसार प्रथम शाळा सुधारण्याचे ठरले आणि तिथूनच शैक्षणिक क्रांतीची मशाल पेटली. हे सारे सांगायला आणि मार्गदर्शन करायला कोणी आमदार, खासदार वा मंत्री या गावात आलेला नव्हता. शेतमजुरांचा स्वयंभु निर्णय होता. मग शाळेत शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांची बैठक बोलावण्यात आली. त्यांनाही शाळा सुधारण्याचे आवाहन करण्यात आले. त्याच बैठकीत दीड लाख रुपये जमा झाले. ग्रामपंचायतीने ठराव केला की प्रत्येक घरामागे ५०० रुपये द्यावेत. ज्या शेतमजुरांची ऐपत नव्हती त्यांना त्यातून वगळण्यात आले. काही वयोवृद्ध माणसांची मुले गावाबाहेर नोकरीसाठी गेली होती. त्यांनी सुद्धा मडक्यामध्ये लपवून ठेवलेले पाचशे रुपये आनंदाने दिले. अर्ध्या दिवसातच तीन-चार लाख रुपये जमा झाले.

आता शाळा बांधायची म्हटल्यानंतर दगड, सिमेंट, वाळू आली. या कामाला गावातील जे गवंडी होते ते पुढे सरसावले. त्यांनी मोफत काम सुरू केले. रात्री अकरा, बारापर्यंत शाळेची मुलेसुद्धा दगड-माती पुरवत होती. एकेक चिरा एक-दोन ट्रकवाल्यांनी स्वखुषीने आणून शाळेला दिला. प्रत्येक माणसाचा हातभार लागला आणि मग शाळा पूर्ण झाली. २५ गुंठे मधली १२ गुंठ्यांमध्ये ही शाळा बांधलेली आहे, तर बारा गुंठे मुलांना खेळण्यासाठी मैदान ठेवलेले आहे. या बारा गुंठ्यांमध्ये संगणक कक्ष आहे. पूर्ण शाळेच्या क्लासरूममध्ये व्हरांड्यात उद्बोधक चित्रे रंगवलेली आहेत. मुला-मुलींसाठी स्वच्छ स्वच्छतागृह आहेत. पिण्याच्या पाण्याची सोय आहे आणि परसबाग आहे की ज्या परसबागेतून येणाऱ्या भाजीपाल्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या दुपारच्या जेवणासाठी केला जातो.

या शाळेतून शिकून गेलेला एक विद्यार्थी आता पीएचडी झाला आहे. यापूर्वी इथली मुले शिक्षणासाठी बाहेर पाठवली जात, पण आता बाहेरची मुले या शाळेमध्ये शिक्षणासाठी पालक पाठवू लागलेत. याचा आनंद गावकऱ्यांना होतो. लोकसहभागातून काय काय करता येते याचे हे मोठे उदाहरण आहे. रेश्मा राजाराम पाटील सरपंच आहेत. शोभा धनवडे उपसरपंच आहेत. नीलम डवर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आहेत. या साऱ्या महिलांनी या कामांमध्ये पुढाकार घेतलेला आहे. या शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश शंकर कानकेकर यांना राज्य पुरस्कार मिळालेला आहे. या शाळेमध्ये फुलपाखरांची बाग आहे, परसबाग आहे. शाळा प्लास्टिक मुक्त व तंबाखू मुक्त आहे.

१९५५ ला सुरू झालेली शाळा चौथीपर्यंत होती, १९९५ पासून सातवीचा वर्ग सुरू झाला आणि आज ही श्रमदानातून उभारलेली शाळा केवळ भुदरगड, राधानगरी तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यात एक आदर्श शाळा बनली आहे. तिचा नावलौकिक हळूहळू राज्यभर पसरत आहे. जर गावाने ठरवले तर काहीही अशक्य नाही. भारताचे भवितव्य शेतमजूरही घडवू शकतात, असा मोठा आशावाद ह्या खेड्यापासून, छोट्या वाडीपासून प्रेरणा देणारा वाटला.

(सुभाषचंद्र बोस आणि महात्मा गांधी!... पान १२ वरून..)

पक्षाला हिंसात्मक, साम्राज्यवाद विरोधी व डाव्या विचारांची लागण झाली तर आपल्याला खूप जड जाईल याची भीती वाटल्याने त्यांना त्यांच्या घरी नजर कैदेत ठेवून त्यांची प्रत्येक हालचाल टिपणं सुरू करण्यात आले. सहकाऱ्यांच्या मदतीने बोस यांनी भारत सोडून नन्तर आझाद हिंद फौज बनवली तो इतिहास ज्ञातच आहे.

बोस यांनी आपल्या प्रेयसीला (नन्तर पत्नी) लिहिलेल्या पत्रात ते शल्य व्यक्त करतात की त्यांना 'नेहरूंकडून पाठिंब्यापेक्षा वरच्या गोष्टी अपेक्षित होत्या ज्या त्यांच्याकडून झाल्या नाहीत. आणि लोकांचा विश्वास जिंकूनही भारताच्या महानतम व्यक्ती (गांधी) यांचा विश्वास जिंकू शकलो नाही' यात ते कुठेही गांधींवर आरोप लावत नाहीत आणि आदरयुक्त मतभेदच व्यक्त करतात. सुभाषचंद्र बोस यांचे काँग्रेस, गांधी व भारतीय स्वातंत्र्य चळवळीबद्दलचे आदर व प्रेम कधीच कमी झाले नाही. वैचारिक मतभेद असूनही त्यांनी नेहमी गांधींच्या आंदोलनांना पाठिंबा दिला. याची मुळं सहिष्णू, धर्मनिरपेक्ष व उदारमतवादी कार्यपद्धतीच्या मूल्यांमध्ये आहेत.

६ जुलै १९४४ रोजी सिंगापूरच्या आझाद हिंद रेडिओवरून त्यांनी देशाला सम्बोधित करत असताना महात्मा गांधींचे आशीर्वाद मागितले. सुभाषचंद्र बोस हे पहिले व्यक्ती होते ज्यांनी गांधीजींना 'राष्ट्रपिता' ही उपाधी दिली. गांधी आणि नेहरू हे दोघे बोस यांचे मोठे प्रशंसक होते. गांधी त्यांना 'राष्ट्रभक्तांमधला राजकुमार' म्हणायचे. त्यांनी 'बोस यांची देशभक्ती कोणापेक्षाही कमी नाही' असेही अनेक वेळा म्हटले. हवाईजहाज अपघातात बोस यांच्या मृत्यूची बातमी माहीत पडल्यावर गांधींना अतीव दुःख झाले. त्यांच्या शोकसंदेशात त्यांनी 'बोस आपल्यामध्ये त्यांनी जगासमोर उभारलेल्या आदर्श व विचारांच्या स्वरूपात नेहमी जिवंत आहेत'.

१९४४ साली टोकयो विद्यापीठात विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते म्हणाले भारताला नाझीवाद आणि साम्यवाद याच्या मधल्या विचारधारेची गरज आहे. या विधानाने नेहरू आणि बोस यांच्यातले संबंध अजून दुरावले गेले. बोस हिटलरचा नाझीवाद आणि बेनेटो मुसोलिनीचा फासीवाद याने प्रभावित होते पण पंडित नेहरू ह्या दोन्ही विध्वंसक विचारांचा परिणाम ओळखून होते. त्यांना हिटलर-मुसोलिनीची तीव्र चीड होती. त्यांनी स्पष्ट म्हटले होते की फासीवाद आणि साम्यवाद यांच्यात कुठलाच मध्यममार्ग शक्य नाही आणि नाझीवाद फासीवाद ही भांडवलशाहीची अपरिष्कृत व क्रूरतम रूपं आहेत. पंडित नेहरू आपल्या ह्या महान सहकाऱ्याला अभिवादन करताना लिहितात, 'भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी जीवन अर्पण केले. त्यासाठी त्यांनी एका बहाद्दर सैनिकाप्रमाणे सर्व अडचडींचा वीरतेने सामना केला. त्यांचे देश व स्वातंत्र्यावर निस्सीम प्रेम होते. मी वैयक्तिक पातळीवर त्यांच्या काही धोरणांशी सहमत नसलो तरी त्यांनी जे काही बरोबर वा चुकीचं केलं ते सर्व देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलं. ते आपल्यातून निघून गेले, त्यांनी फॉरवर्ड ब्लॉक बनवलं, त्यांच्या प्रामाणिकतेवर कोणीही शंका घेऊ शकत नाही. त्यांनी आयुष्यभर भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांच्या पद्धतीने लढा दिला.' आजाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांवर जेव्हा लाल किल्ल्यात खटला चालवला गेला तेव्हा त्यांच्या बचावासाठी उभ्या असलेल्या ४ वकीलांपैकी एक जवाहरलाल नेहरू होते.

एक काळ असाही आला जेव्हा गांधी हे बोस यांच्या विद्रोहाशी प्रभावित झाले होते. १९४२ साली पूर्वोत्तर भागात बोस यांच्या नेतृत्वात आझाद हिंद सेनेने हल्ला चढवला त्याचवेळी गांधींनीही 'भारत छोडो' आंदोलनाची हाक दिली. बोस यांनी आयएनएच्या दोन ब्रिगेड्सचे नाव गांधी आणि नेहरू यांच्या नावावर ठेवले होते. पटेल यांनी मुंबई पोर्टवर सुभाषचंद्र बोस व आयएनएवर तस्करीच्या मार्गाने एक चित्रफीत मिळवली. त्याचे गुप्त प्रदर्शन दिल्लीच्या रिगल थिएटरमध्ये करण्यात आले. नंतर यात इतर काँग्रेस नेत्यांचे संदेश जोडून देशभरात दाखवण्यात आले. १९३१ सालापर्यंत भगतसिंहच्या फाशीच्या वेळी आपल्या अहिंसेच्या सिद्धांतांना कवटाळून बसलेले गांधी १९४२ येता येता राष्ट्रहितात सशस्त्र संघर्षाला विरोध मावळत गेला आणि बोस यांच्या अहिंसक गुरिल्ला युद्धाला तात्विक पाठिंबा देऊ लागले. काही वर्षांनंतर, १९४६मध्ये जेव्हा भारतीय राष्ट्रीय लष्कराचे (आयएनए)चे सैनिक भारतात मायदेशी परतले तेव्हा पटेल यांनी त्यांना सहाय्य करून त्यांच्या निर्दयी वक्तव्यासाठी आंशिक सुधारणा केली. त्यांच्या वागण्यात व्यवहार्यता होती. सुभाषची प्रतिष्ठा उंचीवर होती व त्यांच्या हृदयातही होती. पटेल यांनी सुभाष बाबू यांनी निर्वासित राहून जे केले त्याचे कौतुक केले.

बोस (१९२१ ते १९४० दरम्यान ११ वेळा भारताच्या वेगवेगळ्या जेलांमधे), जवाहरलाल नेहरू (९ वेळा, ३२५९ दिवस म्हणजे जवळपास १० वर्ष बंदीवास), गांधी (आफ्रिकेत ६ वेळा, भारतात ७ वेळा मिळून एकूण ५ वर्षं) आणि पटेल (५ वेळा सव्वा सहा वर्ष) यांच्यापैकी प्रत्येकाने जेलमध्ये अनेक वर्षे व्यतीत केली. पण १९३० ते १९४० च्या दरम्यान हिंदुत्ववाद्यांनी ब्रिटीशांना कोणत्याही प्रकारे आव्हान दिले नाही.

महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यातले मतभेद आणि एकमेकांच्या त्यागाला घेऊन असलेला सन्मान यावर खरं तर चर्चा झाली पाहिजे. परंतु बोस व पटेल यांचा वापर करून भाजपपुरस्कृत प्रचार सामग्रीत अत्यंत हीन पातळीवरची टीका महात्मा गांधी व नेहरू यांच्यावर केली जाते.

# दांडीयात्रेची नव्वद वर्षं आणि तिचे आजचे महत्त्व !

- अश्वत्थ इस्लामपुरे

१२ मार्च ते ६ एप्रिल, १९३० या एक महिन्याच्या कालखंडात गांधीजींच्या नेतृत्वाखाली दांडीयात्रा पार पडली. ही यात्रा जगभरात दांडी मार्च म्हणूनही प्रसिद्ध आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ही एक महत्त्वाची चळवळ असून गांधीजींच्या सत्याग्रहाचे अत्युच्च प्रतिक आहे. या वर्षी या मार्चचे ९०वे वर्षं साजरे होत आहे. दांडी यात्रा जिला सॉल्ट मार्च, दांडी सत्याग्रह या इतर नावाने ओळखतात तिने ब्रिटीश साम्राज्याला हुलकावणी दिली. ही हुलकावणी अत्यंत अहिंसक पद्धतीने सत्याग्रहाच्या मार्गाने देण्यात आली होती. या यात्रेचे नव्वदाव्या वर्षात या विषयावर अनेक कार्यक्रम होतील; पण या घटनेची समकालीन प्रस्तुती होणे गरजेचे आहे. ज्या तत्त्वांना आत्मसात करून गांधीजींनी या यात्रेचे संयोजन केले होते त्या तत्त्वांचा प्रसार आजच्या समाजात उचितपणे व्हायला हवा आहे. या मार्चचे नेतृत्व गांधीजी यांच्यासह अनेक नेत्यांनी केले होते. सरोजिनी नायडू, मीराबेन, सरदार पटेल, मौलाना आजाद, मिठूबेन पेटीट, खान अब्दुल गफार खान या नेत्यांनी ६०,००० कार्यकर्त्यांना ज्याप्रकारे नियंत्रित केलं आणि ही यात्रा पूर्ण केली त्यांचे संघटनकौशल्य प्रशंसनीय आहे. साबरमती आश्रमापासून हा मार्च सुरू झाले आणि नवसारी जिल्ह्यातील दांडी या समुद्रकिनाऱ्यावरील खेड्यात संपले. साधारणपणे ३८४ किमीचा प्रवास या मार्चमधील सहभागी कार्यकर्त्यांनी चालत पूर्ण केला. दररोज ठराविक अंतर चालून, ठरलेल्या आश्रमात रात्री वस्ती करून दुसऱ्या दिवशी परत सकाळी लोक चालायला लागायचे. नडियाद, अंकलेश्वर, सुरत, आणंद या ठिकाणी मध्यंतर घेतले जायचे. या मार्चचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे की यात स्त्रियांचा हजारोंच्या संख्येने सहभाग होता.

१९२९ च्या सुमाराला दुसरी गोलमेज परिषद आटोपून भारतीय नेतेमंडळी मायदेशी परतली होती. त्याचवर्षी लाहोरमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न झाले होते. या अधिवेशनात भारताचा राष्ट्रध्वज रावी नदीच्या किनारी फडकवण्यात आला होता आणि पूर्ण स्वराजचा नारा जवाहरलाल नेहरूंनी दिला होता. भारत हा राजकीय, सांस्कृतिक, आर्थिकदृष्ट्या सार्वभौमत्व स्वीकारेल आणि हे सार्वभौमत्व मिळवण्यासाठी साम्राज्यवादी सरकारशी असहकार्य असेल असा ठराव जाहीर केला. काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने गांधीजींना असहकार आंदोलन निर्माण करण्याची आणि त्याचे नेतृत्त्व करण्याची जबाबदारी दिली. जी त्यांनी स्वीकारली. गांधीजींच्या मनात मिठाचा सत्याग्रहच होता. तोही शांतता आणि अहिंसेच्या मार्गानेच व्हायला हवा असे त्यांचे ठाम मत होते. पण काँग्रेसच्या इतर नेत्यांना ही गोष्ट फारशी पटली नाही. नेहरू आणि दिव्यलोचन साहू यांनी गांधीजींना आणखीन एकदा नीट विचार करा असे सांगितले. सरदार पटेल यांनी जमिनीच्या करावर बहिष्कार घालून असहकार चळवळ राबवावी असे सुचवले. गांधीजी आपल्या मतांवर ठाम होते. ब्रिटीश सरकारच्या त्याकाळातील आर्थिक उत्पन्नात मिठाच्या कराने ८.३% एवढे योगदान दिले होते. जमीन, हवा आणि पाण्यानंतर माणसाला चवीसाठी मीठ हवे असते. मीठ ही उपजीविका आहे आणि मिठाचा कर भारतीय लोकांना दारिद्र्यात ढकलत आहे. त्यामुळे मिठाचा सत्याग्रह हा व्हायलाच हवा. गांधीजींची ही हाक राजगोपालचारी यांनी ऐकली, त्यांनी या संकल्पनेला पत्राद्वारे पाठींबा लिहून कळवला. शेवटी काँग्रेस वर्किंग कमिटीने देखील हे धोरण स्वीकारले. नामवंत ब्रिटीश वृत्तपत्र द स्टेट्समनने गांधीजींच्या विचारांची खिल्ली उडवली होती. हसू येतंय पण आम्ही ताबा ठेवतो, बघूया किती लोक येतात रस्त्यावर! असे एका लेखात लिहिले गेले होते. दुसरीकडे, व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन म्हणाले की मिठाच्या सत्याग्रहाने माझी झोप उडेल असे काही होणार नाही. या सगळ्यांचे अंदाज वरवरचे होते हे काळानेच सिद्ध करून दाखवले.

१२ मार्च रोजी, गांधीजी ८० सत्याग्रहींना सोबत घेत दांडीच्या दिशेने चालू लागले. त्यांच्याबरोबर प्यारेलाल नय्यर, छगनलाल जोशी, पंडित नारायण खरे, गणपतराव गोडसे, जयंतीबेन पारेख, अब्बास वर्तेजी सह इतर ७४ सत्याग्रही यात सामील झाले. १६ वर्षांचे विठ्ठल ठक्कर हे सर्वात तरुण सत्याग्रही. सरोजिनी नायडूंना स्त्रियांचे नेतृत्व करण्याचे सांगितले होते. सत्याग्रही चालायचे, दुपारी मध्यंतर घेतले जायचे. तिथे गांधीजी भाषण करून सत्याग्रहींची संख्या वाढवायचे. गांधीजींचे हे कौशल्य इतर नेत्यांपेक्षा वेगळे होते. स्त्रियांना सामावून घेण्यासाठी गांधीजी म्हणायचे – उद्या तुमच्या घरातील स्वयंपाकात मीठ नसेल, तुमची खिचडी, कढी बिनचवीची असेल. मीठ मिळवण्यासाठी तुम्ही सामील व्हा. ही अतिशय निरागस पद्धत होती राजकीय वास्तव सोप्या शब्दांत सांगण्याची. कारण स्वयंपाकात मीठ कमीजास्त झालं की पुरुषमंडळी घर डोक्यावर घेतात हे महिलांना ज्ञात होतं आणि म्हणूनच त्या या मार्चमध्ये सहभागी झाल्या. ठिकठिकाणी प्रचार करून, लाठीचार्ज आणि अटकेचे दिशांतर सहन करत गांधीजी दांडी येथील समुद्रकिनाऱ्यावर येऊन पोहचले. आपल्या मुठीत मिठाची पूड घेत त्यांनी जाहीर केलं – आज मी ब्रिटीश साम्राज्याच्या आधारशिलेवर प्रहार

Annual Subscription Rs. 250/-
Posting date of Friday-Saturday every week
Published On dated Thursday (19-03-2020)

WPP Licence No. MR/TECH/WPP-16/SOUTH/2018-20
Licence to Post without pre payment
at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai - 1
R. No. 1902/57 Regd. No. MCS/013/2018-20

केला आहे. ती आधारशिला लवकरच नष्ट होणार आहे. गांधीजींनी मिठाचे वाटप केले. किनाऱ्यावरील वाळूत आपल्या बोटांनी गांधीजींनी मी आज जगाकडून केवळ सहानुभूती मागत आहे, या अहिंसक, शांततामय सत्याग्रहात मला तुमची गरज आहे असे निरोप लिहून काढले.

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या उषा मेहता म्हणतात की या कृतीचा भारतीय महिलांवर खूप परिणाम झाला. खुद्द उषा मेहता यांच्या आई, आजी, मावशी आणि पणजीने समुद्राचे पाणी घरात आणले, मीठ तयार करून त्याचे वाटप देखील केले. अटकेची भीती ज्यावेळी पुरुषमंडळी दाखवायची तेव्हा त्या म्हणायच्या – सरोजिनी नायडूंना अटक होऊ शकते मग आम्हाला का नाही? आम्ही त्यांचे अनुयायी आहोत, त्यांचे आदर्श पुढे नक्की नेऊ. आधुनिक काळात डॉ मार्टिन लुथर किंग सारख्या सामाजिक कार्यकर्त्यींनी देखील दांडी मार्चचे कौतुक केले आहे; पण असे मार्च आता भांडवलशाही आणि विषमतेच्या विरोधात व्हायला हवेत असे त्यांनी नमूद केले आहे. भारतातील दूरस्थ खेड्यात आदानी-सारखा उद्योगपती शेतवाडी विकत घेतो आणि बोर्ड निर्माण करून सांगतो की गावातील त्याच्या मालकीच्या परिसरात येण्यास मनाई आहे असे लिहून ठेवतो. देशातील एकही राजकीय नेता या विरोधात आवाज उठवत नाही हे अत्यंत दुर्दैवी आहे. देशात प्रतिकार करायचा असेल तर गांधीजींचा सत्याग्रह हाच मार्ग उचित आहे, ज्याने ब्रिटीश साम्राज्याचे अस्तित्व संपवले त्या मार्गाने भारतातील सामाजिक समस्या का संपू नयेत?

***NRC विरोधी सनदशीर आंदोलनातूनच भाजप आरएसएस सरकारपासून आझादी आंदोलन पेट घेईल...**

# कॉ. अमृत महाजन यांचा आंदोलनाच्या ७५व्या दिनी इशारा !




**जळगाव :** NRC-CAA-NPR कायदे देशात दलित, आदिवासी ,भटके ,विमुक्त तसेच निर्धन, निरक्षर जनतेविरुद्ध सवर्ण जनता अशी फूट पाडणारे कायदे असून या कायद्याच्या विरुद्धची संविधान बचावची सनदशीर लढाई सुरू ठेवली पाहिजे. यातूनच जनतेत धर्माच्या नावावर फूट पाडणारे भाजपा-आरएसएस सरकारपासून आझादीचे आंदोलन पेट घेईल असा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. अमृत महाजन यांनी जळगाव येथे मुस्लिम मंचतर्फे NRC-CAA-NPR रद्द करा मागणीसाठी सुरू असलेल्या जळगाव येथे आंदोलनाच्या ७५ व्या अमृत निषेध दिनी आंदोलनाला पाठिंबा देताना दिला. जळगाव मुस्लिम मंच तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेला भारतीय नागरिकत्व सुधारणा कायदा व राष्ट्रीय जनसंख्या नोंदणीला विरोध म्हणून १७ मार्च रोजी ७५ वा दिवस होता.समाजवादी नेते, खलील देशमुख, कॉंग्रेस आयचे मुफ्ती हारून नदवी, कविवर्य रागिब ब्यावली, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गफ्फार मलिक, डॉ. अमानुल्ला शाह, करीम सालार तर महिलांमध्ये तबस्सुम सुलताना, मुबाशिरा शेख मुख्तार तहेरिन शेख सादिक, मसेरा शेख शकिल, गजाला शेख जाकीर, मुनज़्ज़ा शेख सलीम इ.

**भाषणानंतर...**

तीन ठराव संमत आंदोलनात संमत करण्यात आले. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले ते असे...

१) इंडिया टीव्हीने जो कार्यक्रम सादर केला व त्या कार्यक्रमामुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल असे प्रसारण केले त्याचा हे धरणे आंदोलन जाहीर निषेध करीत असून त्या चित्रफितीची सविस्तर चौकशी होऊन त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी करीत आहे.
२) मुफ्ती हारून नदवी, मुफ्ती अशपाक कासमि व इतर सर्व महाराष्ट्रातील मुफ़्तीन बाबतीतचे काही चुकीचे वक्तव्य केले जात आहे त्याचाही जाहीर निषेध करण्यात आला व जळगाव मुस्लिम मंच व संविधान बचाव नागरी कृती समिती या सर्व मौलवींच्या पाठीशी आहे असे सर्वसंमतीने ठरले.
३) जळगाव शहरातील कोणत्याही वॉर्डातून एनपीआरची माहिती दिली जाणार नाही NPR माहिती देणे वर बहिष्कार करीत आहोत असे ३ ठराव संमत झाले...

**अप्पर जिल्हाधिकारी यांना निवेदन !**

अमृत निषेध दिनानिमित्त दोन निवेदने देण्यात आली एक निवेदन महिलांच्या माध्यमाने, त्यात आम्ही राष्ट्रीय जनसंख्या नोंदणीला कोणतीही माहिती देणार नाही व आम्ही एनपीआरचा बायकॉट करीत आहोत. दुसरे निवेदन पुरुषमंडळीने दिले त्यात सुधारित नागरिकत्व कायदा मागे घेण्यात यावा अथवा त्यात धर्माच्या आधारे दिलेले नागरिकत्व परत घेण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य कौन्सिलच्या मालकीचे 'युगांतर' हे साप्ताहिक गोविंद अनंत पाटकर, मुद्रक यांनी न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भुपेश गुप्ता भवन, ८५ सयानी रोड, प्रभादेवी मुंबई ४०००२५ येथे छापून गोविंद अनंत पाटकर, प्रकाशक यांनी राजभुवन ३१४, एस. व्ही. पी. रोड, मुंबई ४००००४ येथून प्रकाशित केले. संपादक भालचंद्र खं. कानगो.
'Yugantar' weekly owned by Communist Party of India Maharashtra State Council, is Printed by Govind Anant Patkar, Printer, at New Age Printing Press, Bhupesh Gupta Bhavan, 85 Sayani Road, Prabadevi, Mumbai-400025 and published by Govind Anant Patkar, Publisher at 314, Rajbhawan, S.V.P. Road, Mumbai 400004. Editor : Bhalchandra K. Kango.